क्रमांक : प्र/आस्था-२/शार्प-२०C२५Z/२०२६/३९९ दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२६

**विषय :शार्प-२०C२५Z ह्या चार यंत्रांचा पूर्ण देखभाल व दुरूस्ती (Comprehensive) करार करणेबाबत.**

मा. उप मुख्यमंत्री यांचे "नंदनवन" शासकीय कार्यालय आणि प्राधिकरणातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भूमि व मिळकत शाखा, भू-संपादन व पुनर्वसन शाखा आणि मेट्रो अंमलबजावणी शाखा (प्रणाली) या विभागातील शार्प BP२०C२५Z मॉडेलच्या खालील तक्त्यात नमूद चार यंत्रांचा संपूर्ण देखभाल व दुरूस्ती (Comprehensive), त्यांचा आधीचा करार कालावधी संपुष्टात आल्याच्या दिनांकापासुन पुढील तीन वर्षांकरीता करार करणे आहे. सदर यंत्रे सन २०२१-२२ रोजी खरेदी करण्यात आली असून ती कार्यरत आहेत.

२. यास्तव, शार्पच्या प्राधिकृत सेवापुरवठादारांकडून दरपत्रक मागवित आहे. इच्छुक स्थानिक प्राधिकृत सेवापुरवठादाराने त्यांची दरपत्रके **दिनांक ०६ मार्च, २०२६** रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सचिव, कार्यकारी समिती, प्रशासन विभाग येथे सादर करावीत. सदर मुदतीनंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

३. प्राधिकृत सेवापुरवठादाराने दरपत्रक कंपनीच्या लेटर हेडवर तसेच दरपत्रकासोबत मालकाचे नाव व कंपनीचे पॅनकार्ड, जीएसटी प्रमाणपत्र व अधिकृत विक्रेता प्रमाणपत्र सादर करावेत.

**<u>दरपत्रकाचा नमुना</u>**

| अ. क्र. | मॉडेल क्र. | यंत्र क्रमांक | Installation दिनांक | दर (रू) (वस्तु व सेवा वगळून) A४ | | वस्तु व सेवा कर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | B/W | Colour | |
| १ | शार्प BP२०C२५Z | १F००२०५५ | १२.१०.२०२१ | | | |
| २ | | १F००२६० | २३.०४.२०२२ | | | |
| ३ | | १F०००२५० | ११.०६.२०२२ | | | |
| ४ | | १F१८००३३० | १४.०६.२०२२ | | | |

४. उपरोक्त विषयासंबंधीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

१) प्राधिकृत सेवापुरवठादारास यापूर्वी शासकीय / निमशासकीय कार्यालयास शार्पच्या झेरॉक्स / कॉपीयर यंत्रांच्या संपूर्ण देखभाल व दुरूस्ती (Comprehensive) सेवा पुरविण्याचा ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

..२/-

२) दर तक्त्यामध्ये A-४ च्या कृष्ण धवल व रंगीत प्रती झेरॉक्स कॉपीचे दर नमूद करून वस्तु व सेवा कराचा दर स्वतंत्रपणे नमूद करावा. सदर दर नमूद करताना कोणताही अतिरिक्त दर अंतर्भूत नसावा.

३) त्याचप्रमाणे यंत्रांच्या देखभाल व दुरूस्ती करीता येणाऱ्या सेवापुरवठादाराच्या अभियंत्यास कोणत्याही प्रकारचे Mechanic Wages, installation charges, parts, spare parts, labour, tool इ. करीता कोणताही खर्च प्राधिकरणाद्वारे दिला जाणार नाही.

४) शार्पच्या प्राधिकृत सेवापुरवठादाराचा मागील तीन आर्थिक वर्षांतील प्रती वार्षिक आर्थिक उलाढाल रू.२/- कोटी असणे आवश्यक आहे.

५) संपूर्ण देखभाल व दुरूस्ती (Comprehensive) करारांतर्गत देखभाल, आवश्यकतेनुसार टोनर्स पुरविणे, मासिक देखभाल व दुरूस्ती (आवश्यकतेनुसार), यंत्राच्या पार्टसमध्ये बिघाड झाल्यास तो बदलून त्याच कंपनीचा पार्टस / स्पेअर पार्टस बसवून देऊन सदर यंत्र पूर्ववत कार्यरत करणे इ. समावेश आहे.

६) बिघाड झालेल्या यंत्रातील दोष शोधून त्याचे ४८ तासांत निवारण करणे आवश्यक आहे. सदर यंत्राची दुरूस्ती संबंधित विभागामध्ये करणे आवश्यक आहे. अपरिहार्य परिस्थितीमध्ये सदर यंत्र त्यांच्या वर्कशॉपमध्ये दुरूस्तीकरीता नेल्यास त्याजागी तातडीने दुसरे / बदली स्टॅण्डबाय झेरॉक्स यंत्र सेवापुरवठादाराने पुरविणे आवश्यक आहे.

७) प्राधिकरणाद्वारे कोणत्याही प्रकारचे स्पेअर पार्टस, कन्स्युमेबल आयटम पुरविण्यात येणार नाही.

८) शार्पच्या प्राधिकृत सेवापुरवठादार हा स्थानिक असावा तसेच त्याचे कार्यालय मुंबई परिसरात असावे.

९) प्राधिकृत सेवापुरवठादाराने पॅन कार्ड, आधार कार्ड तसेच, मागील तीन आर्थिक वर्षांचा आयकर दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे. तसेच, ISO ९००१ Certification आवश्यक आहे.

१०) निविदा क्रमांक OEM Manufacturers Authorization from (MAF) Certificate असणे आवश्यक आहे.

११) प्राधिकृत सेवा पुरवठादाराचा समावेश शासनाच्या काळ्या यादीत नसावा. तसे आढळल्यास त्याची निविदा ग्राह्य न धरता ती रद्द करण्यात येईल.

..३/-

१२)संपूर्ण देखभाल व दुरूस्ती (Comprehensive) कराराच्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये दरामध्ये प्राधिकृत सेवापुरवठादाराने प्रती झेरॉक्स कॉपींकरीता नमूद केलेले दरच कायम राहतील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दर वाढ/बदल केला जाणार नाही.

१३) प्राधिकृत सेवापुरवठादाराकडून पुरविण्यात येणारी सेवा समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सदर करार मुदतीच्या आधी त्याबाबतची सूचना देऊन अथवा न देता रद्द करण्याचा अधिकार आहे.

१४) देयक सादर केल्याच्या दिनांकापासून देयकाची रक्कम सुमारे ३० दिवसांत ई-पेमेंटद्वारे अदा करण्यात येईल.

१५)आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे कार्यादेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्राधिकरणास लेखी पत्र सादर करावे.

१६)हे प्राधिकरण कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही निविदा / दरपत्रक फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहे.

**सचिव,**
**कार्यकारी समिती (अ.का.)**